वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि. १ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# खंडणी प्रकरणाचा संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबध ?

## सीआयडीकडून तीन लोकांना समन्स, सरकारकडून एसआयटी स्थापन



बीड, (दिव्य न्युज):- दोन कोटी खंडणीच्य प्रकरणात फरार असलेल्या वाल्मीक कराडने आत्मसमर्पण केल्यानंतर संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या तपासाला वेग आला आहे. दोन कोटींची खंडणी आणि संतोष देशमुख हत्या या दोन्हींचा संबंध असल्याने सीआयडी या अनुषंगाने तपास करत आहे. सीआयडीने या प्रकरणात आता तीन लोकांना चौकशीसाठी समन्स बजावले आहे. पीटीआय वृत्तसंस्थेने सीआयडी ▶▶ पान २ वर

Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

### वाल्मिक कराडचा मोबाईल फॉरेन्सिक तपासणीला पाठवला

बीड, (दिव्य न्युज):- खंडणी हत्या आणि ॲट्रॉसिटी प्रकरणातील फरार असलेल्या सर्व बँक खाती गोठवली आहे. तसेच या प्रकरणातील फरार आरोपी आणि नातेवाईकांचे सर्व खाते गोठवले आहेत. आज दिवसभरात २५ जणांची चौकशी होणार असून मोबाईल रिकव्हर डाटा फॉरेन्सिक रिपोर्ट पाच दिवस येण्याची शक्यता आहे.

वाल्मिकचे आणखी कोणत्या कोणत्या बँकेत खाती आहेत त्याचा शोध सुरू आहे. पॅन कार्ड लिंक असलेली सर्व संपत्ती संदर्भातील माहिती जमा करण्यात आली आहे. महसूल विभागाकडून जमिनीची सर्व माहिती मागितली आहे. फरार आरोपी संबंधित बँकेची ▶▶ पान २ वर

### हत्या प्रकरणाच्या तपासासाठी सरकारकडून एसआयटी स्थापन

बीड (दिव्य न्युज ):- बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सरकारने एक महत्त्वाचं पाऊल उचललं आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी राज्य सरकारने एसआयटीची समिती स्थापन केली आहे. या समितीत ९ पोलीस अधिकारी आहेत. आयपीएस बसवराज तेली यांच्या नेतृत्वात एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. बसवराज तेली सीआयडीमधील आर्थिक गुन्हे शाखेचे प्रमुख आहेत. एसआयटीमध्ये सर्वच अधिकारी बीड जिल्ह्यातले आहेत. सध्याचे तपास अधिकारी डीवायएसपी अनिल गुजर हेही तपास पथकात असणार आहेत. ▶▶ पान २ वर

### कराड याची प्रकृती बिघडली ? ऑक्सिजन लावले ?

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी वाल्मिक कराड मंगळवारी पुणे सीआयडीला शरण आला. त्यानंतर त्याला अटक करुन बीड जिल्ह्यातील केज न्यायालयात मंगळवारी रात्री आणण्यात आले. न्यायालयाने त्याला १५ दिवसांची सीआयडी कोठडी दिली. बुधवारी रात्री दीड वाजता केज न्यायालयातून बीड शहर पोलीस ठाण्यात त्याला आणण्यात आले होते. त्यानंतर त्याची प्रकृती बिघडली. त्यामुळे त्याला काही वेळ ऑक्सिजन लावावे लागले. सीआयडीच्या कोठडीत रात्री त्याची शुगर वाढली. त्यामुळे त्याला डॉक्टरांनी ऑक्सिजन लावले.

### 'फरार आरोपींना अटक न झाल्यास मराठे रस्त्यावर उतरणार'– मनोज जरांगे

जालना (दिव्य न्युज ):-बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील मुख्य आरोपी



अद्यापही मोकाटच आहेत. वाल्मीक कराड याला सीबीआयने ताब्यात घेतले असून कोर्टाने १४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, मुख्य आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी आज मस्साजोग येथील ▶▶ पान २ वर

## मस्साजोग ग्रामस्थांचे जलसमाधी आंदोलन

### फरार आरोपींना १० दिवसांत अटक करण्याची पोलिस अधीक्षकांनी दिली ग्वाही

बीड(दिव्य न्युज ):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना पकडण्यात पोलिसांना अपयश आल्याने मस्साजोगचे ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. सर्व गावकऱ्यांनी नववर्षाच्या पहिल्याच दिवशी सामूहिक जलसमाधी आंदोलन केले. सुमारे दोन तास हे आंदोलन चालले. आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याचे पोलिस अधीक्षक नवीन कॉवत यांनी आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले.

संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना तत्काळ अटक करावी आणि त्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी, या मागणीसाठी मस्साजोगच्या गावकऱ्यांनी सामूहिक जलसमाधी आंदोलन केले. या आंदोलनात महिला, ज्येष्ठ नागरिकांसह मुलेही पान २ वर






## लाचखोर मुख्याध्यापक सुर्वे विरोधात गुन्हा दाखल

### गटशिक्षण अधिकाऱ्याची सही घेण्यासाठी केली होती पैशाची मागणी

केज(दिव्य न्युज ):- वैद्यकीय रजेवर कर्तव्यात रुजू करून घेण्याच्या अर्जावर गटशिक्षण अधिकार्याची सही घेण्यासाठी दोन हजार रुपये लाचेची मागणी करणार्या मुख्याध्यापकाविरोधात लाचलूचपत विभागाने गुन्हा दाखल केला.

सदरील हा मुख्याध्यापक केज तालुक्यातील विडा येथील आहे. सहशिक्षक सचीन नन्नवरे हे वैद्यकीय रजेवर होते. त्यांची रजा संपल्यानंतर कर्तव्यावर रुजू करून घेण्यासाठी त्यांनी विडा जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक सुर्वे यांच्याकडे अर्ज केला होता. या अर्जावर गटशिक्षण अधिकार्याची सही घेण्यासाठी मुख्याध्यापक सुर्वे यांनी सहशिक्षक नन्नवरे यांच्याकडे पैशाची मागणी केली. दोन हजार रुपये देण्याचे ठरले होते. याबाबत नन्नवरे यांनी लाचलूचपत विभागाकडे तक्रार दाखल केली होती. लाचलूचपत विभागाने सापळा रचला होता. सुर्वे यानीं २ हजार रुपये घेण्याचा प्रयत्न केला होता. तसे सिद्ध झाले. त्यामुळे सुर्वे यांच्या विरोधात केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सदरील ही कारवाईपोलीस निरीक्षक लाचलूचपत विभाग यांनी केली असून या प्रकरणाचा अधिक तपास शेख युनूस हे करत आहेत.

## तालुक्यातील आणखी एका माजी सरपंचास अपहरण करुन अडीच लाख रुपयाला लुटले

बीड(दिव्य न्युज ):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्ये प्रकरणाने राज्यात खळबळ माजलेली असतानाच बीड जिल्ह्यात पुन्हा एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आसून आणखी एका माजी सरपंचाचे अपहरण करुन त्याला अडीच लाख रुपयास लुटल्याचा प्रकार समोर आला आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. या प्रकरणातील चार आरोपींना अटक करण्यात आली असून अद्याप तीन आरोपी फरार आहे. हे प्रकरण ताजे असतानाच आता बीड जिल्ह्यात पुन्हा हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून केज तालुक्यातील एक माजी सरपंच पायात कुलूप घातलेल्या अवस्थेत पोलीस अधीक्षक कार्यालयात दाखल झाला आसुन ज्ञानेश्वर इंगळे असं



त्यांच नाव आहे. ते केज तालुक्यातील कळंब अंबा येथील रहिवासी आहेत. ना पंकजाताई मुंडे यांच्याकडून २० लाखाच्या फंडाचे पत्र आणायचे त्यासाठी १० टक्के रक्कम म्हणून २ लाख रु सोबत घ्यायला लावून दत्ता तांदळे नामक व्यक्तीने केज मधील कळंब चौकातून मुंबईला जायचे म्हणून इंगळे यास फोरव्हीलर गाडीत बसवले. पाटोदा जवळ गेल्यानंतर तांदळे याने इंगळे यास रस्त्याच्या कडेला असलेल्या घरात नेऊन दोन लाख ७ हजार रोख व फोन पे मधील ▶▶ पान २ वर

## पांगरी शिवारात रब्बी पिकांची रानडुकरांकडून प्रचंड नुकसान

### शेतकऱ्यांकडून नुकसान भरपाईची मागणी

किल्ले धारूर (दिव्य न्युज ):- तालुक्यातील पांगरी येथे रब्बी हंगामात राजमा गहू ज्वारी हरभरा यासह अन्य पिकांचा पेरा करण्यात आलेला आहे.परंतु मागील अनेक दिवसांपासून ही पिके बहरात असताना हरीण रानडुक्कर या जंगली प्राण्यांच्या कडून या रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर सध्या नुकसान सुरू आहे.गावातील गट नंबर ७७ येथे साहेबराव थोरात आणि याच गटातील अन्य शेतकऱ्यानी हरभरा पिकाची पेरणी केलेली आहे.या ठिकाणी रानडुकरांकडून अक्षरशः ही पिके फस्त करत शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान केले आहे.सदरील जंगली प्राण्यांचा बंदोबस्त करत नुकसान भरपाई ची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

धारूर तालुक्यात यंदा रब्बी हंगामात शेतकऱ्यांकडून राजमा गहू ज्वारी हरभरा यासह अन्य पिकांचा पेरा मोठ्या प्रमाणावर करत पिके जोपासले आहेत.विशेष म्हणजे विजेचा लपंडाव यातून कसरत ▶▶ पान २ वर

## गुटखा असणारा आयशर टेम्पो गेवराई महामार्ग पोलिसांनी पकडला

बीड (दिव्य न्युज ):- गुटका असणारा आयशर टेम्पो गेवराई महामार्ग पोलिसांनी पकडला आहे त्यात किती गुटखा आहे याची खातरजमा करणे साठी पोलीस स्टेशन गेवराई येथे आयशर व ड्राइवर याना घेऊन जात आहेत अशी माहिती मिळाली नंतर सर्व माहिती कळेल.






## धान-भरडधान्य खरेदीसाठी शासकीय पोर्टलवर नोंदणी करण्यास १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ-मंत्री धनंजय मुंडे

मुंबई , (दिव्य न्युज):- शासकीय खरेदी केंद्रावर धान/ भरडधान्य विक्रीसाठी शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे. त्याकरिता ३१ डिसेंबरपर्यंतची मुदत होती. मात्र अनेक शेतकरी नोंदणीपासून वंचित असल्याने विविध लोकप्रतिनिधिच्या मागणीस अनुसरून शासनाने नोंदणीसाठी १५ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे, अशी माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ना. धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये यासाठी महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून धान/ भरडधान्य खरेदी केले जाते. त्यासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे.

खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये शेतकरी नोंदणी करता ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत अंतिम मुदत होती. मात्र अनेक भागातील शेतकरी नोंदणीपासून वंचित असल्याने शासनाने नोंदणीसाठी मुदतवाढ द्यावी अशी मागणी अर्थ व नियोजन विभागाचे राज्यमंत्री ▶▶ पान २ वर



# नव्या वर्षात बीडमध्ये पोहोचणार रेल्वे, प्रजासत्ताक दिनी होणार सातवी चाचणी

प्रतिनिधी | बीड

नगर- बीड- परळी रेल्वे मार्गावरील विघनवाडी ते नवगण राजुरी अशा २४.८५ किलोमीटर अंतरात सोमवारी ताशी १२० किलो मीटर वेगाने रेल्वे इंजिनची वेगमर्यादा चाचणी घेण्यात आली असून आता नवगण राजुरी ते बीड अशा १३ किलोमीटरपैकी पाच किलोमीटर अंतरात रेल्वेचे रूळ अंथरण्याचे काम पूर्ण झाले आहे. येत्या प्रजासत्ताकदिनी २६ जानेवारी २०२५ रोजी नवगण राजुरी ते बीड अशी सातवी डेमो रेल्वे चाचणी होणार आहे. त्यामुळे नवीन वर्षात बीडपर्यंत रेल्वे धावणार आहे. त्यामुळे विकासाच्या दृष्टीने हे पाऊल ठरणार आहे.

नगर -बीड-परळी रेल्वे मार्ग हा २६१.२५ किलोमीटर लांबीचा आहे. नगर ते वडवणी २००.१५ किलोमीटरचा संपूर्ण भाग नवीन वर्षात तयार होणार असून त्यानंतर वडवणी ते परळीपर्यंत ६१.१० किलोमीटरचा उर्वरित भाग २०२६ पर्यंत पूर्ण होणार आहे.नगर-बीड - परळी रेल्वे मार्गावर एकूण २३ स्थानके आहेत.



(छाया : शिवराज माने, बीड)

## बीड-परळी रेल्वे मार्गावर २३ स्थानके

प्रजासत्ताकदिनी २६ जानेवारी २०२५ रोजी नवगण राजुरी ते बीड अशी सातवी डेमो रेल्वे चाचणी होऊन नववर्षात बीडपर्यंत रेल्वे धावणार आहे.

### रेल्वेमार्गाचे दृष्टिक्षेपातील टप्पे

| टप्पा | किलोमीटर | कार्यान्वयीत |
| --- | --- | --- |
| अहमदनगर-नारायणडोह | १२.२७ कि.मी | २९ मार्च २०१७ |
| नारायणडोह-सोलापूरवाडी | २३.२६ कि.मी | २५ फेब्रुवारी २०१९ |
| सोलापूरवाडी-आष्टी | ३०.६४ कि.मी | ३१ डिसेंबर २०२१ |
| आष्टी-अंमळनेर | ३३.९२ कि.मी | ५ जानेवारी २०२४ |
| अंमळेनर - विघनवाडी | ३३.१२ कि.मी. | ९ ऑगस्ट २०२४ |
| विघनवाडी - नवगण राजुरी | २४.८५ कि.मी | ३० डिसेंबर २०२४ |
| नवगण राजुरी - बीड | १३ कि.मी | २६ जानेवारी नियोजित |

## अनेक नामवंत कलाकार घडले



## नाट्यगृहाचे काम अंतिम टप्प्यात

**गेवराई** | गेवराई शहरातील कोल्हेर रोडवरील नगर परिषदेचे अहिल्यादेवी होळकर नाट्यगृहाचे काम अंतिम टप्प्यात असून नवीन वर्षात सुरू होईल. शहरातील जलतरण तलावाचे मागील पाच वर्षांपूर्वी काम सुरू झाले होते. मागील वर्षी जलतरण तलाव सुरू झाला. नवीन वर्षाच्या दोन ते तीन महिन्यात नाट्यगृह सुरु होईल, असे नगर परिषद मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी सांगितले.

गेवराई शहर हे कलावंताचे शहर म्हणून ओळखले जाते. आ.लक्ष्मण पवार यांनी सन २०१९ मध्ये शहरात भव्य नाट्यगृह असावे यासाठी वैशिष्ट्य पुर्ण, विषेश घटक अनुदान प्राप्त करून घेतले आणि २८ फेब्रुवारी २०१९ मध्ये शहरातील कोल्हेर रोडवरील म्हाडा कॉलनी नजीक भव्य अत्याधुनिक , वातानुकूलित ५ कोटी रूपयांच्या नाट्यगृहाचे कुदळ टाकून उद्घाटन करण्यात आले.

## नव्या वर्षात पोलिसांना मिळणार घरे, २४१ फ्लॅटचे काम पूर्ण

**बीड** | नव्या वर्षात पोलिस बांधवांसाठी खुशखबर असून त्यांना नवे घरे मिळणार आहेत. पोलिस मुख्यालयाजवळ पोलिस वसाहतीत २४१ फ्लॅटचे काम पूर्ण झाले असून प्रजासत्ताक दिनी त्याचे लोकार्पण करण्याची तयारी सुरु आहे.बीड पोलिस मुख्यालयाजवळ असलेल्या पोलिस वसाहतीत मागील काही वर्षांपासून पोलिस कर्मचाऱ्यांसाठीच्या नव्या इमारतीचे काम सुरु होते. सुमारे तीन ते चार वर्षांपासून सुरु असलेले हे काम आता पूर्ण झाले आहे. त्यामुळे पोलिसांची नव्या घराची प्रतीक्षा संपली आहे. पोलिस मुख्यालयाजवळ वसाहतीत एकूण तीन मोठ्या विंग आहेत. यात, टाईप २ प्रकारात एकूण ५ इमारती आहेत. ही प्रत्येक इमारत सात मजल्यांची आहे. एका इमारतीत पोलिस कर्मचारी, अधिकाऱ्यांसाठी २ बीएचके ४२ फ्लॅट आहेत.



## १४ कोटींच्या निधीतून होणार बीड बसस्थानक

बीड बसस्थानकाचे काम सध्या सुरु आहे. यासाठी १४ कोटींचा निधी मंजूर होता. मे महिन्यातच हे लोकार्पण होणे अपेक्षित होते मात्र हे काम धिम्या गतीने होत आहे. मात्र आता नव्या वर्षात या कामाला गती येऊन येत्या दोन महिन्यात बसस्थानकाचे काम पूर्ण होण्याचा अंदाज आहे. या नवीन बसस्थानकामुळे प्रवाशांची गैरसोय होणार नाही. यामध्ये लोकांना अनेक सोयीसुविधा मिळणार आहेत. येत्या मे महिन्यापर्यंत या नवीन बसस्थानकाचे लोकार्पण होणार असल्याचा अंदाज आहे.

## कुपोषित बालकांसाठी विशेष वॉर्ड



## १०० खाटांचे माता रुग्णालय सेवेत

**बीड** | जिल्हा सामान्य रुग्णालयात राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून २१ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले १०० खाटांचे महिला व बाल रुग्णालय सुरु होणार आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय ३२० खाटांचे आहे. मात्र, इथे क्षमतेपेक्षा अधिक रुग्ण असतात. प्रसूतीसाठी येणाऱ्या माता, बालके यांच्यासाठी विशेष रुग्णालय असावे असा प्रस्ताव आरोग्य विभागाने पाठवला होता. १०० खाटांचे रुग्णालय उभारण्यास शासनाने मंजुरी दिली होती. यासाठी २१ कोटींचा निधी दिला होता. मात्र हे काम धिम्या गतीने सुरु होते. विद्युतीकरण व इतर बाबी बाकी होत्या. डॉ. अशोक थोरात यांनी जिल्हा शल्यचिकित्सक म्हणून पदभार घेतल्यानंतर या इमारतीच्या कामाला गती दिली. विद्युतीकरणासह इतर किरकोळ कामे पूर्ण झाले आहेत.

पान ४ वरून

## चार वर्षांपासून

सगळा कारभार प्रशासकांच्या हाती देण्यात आला

राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, आदींच्या निवडणुका कधी कोरोनाच्या संसर्गाचे कारण देत, तर कधी ओबीसी आरक्षणाचा मुद्दा समोर आणून घेतल्या गेल्या नाहीत. ओबीसी आरक्षण द्यायचे की नाही यावरसुद्धा बराच गदारोळ झाला. कोरोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतर २०२० पासून राज्यात कुठे एकदा तर कुठे दोनदा, तीनदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी करण्यात आली होती. कोल्हापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीची तयारी तर तीन वेळा करण्यात आली. आज राज्यात एकही महानगरपालिका, जिल्हा परिषदेवर लोकप्रतिनिधी नाहीत, तेथील सगळा कारभार प्रशासकांच्या हाती देण्यात आला आहे. लोकसभेसह विधानसभा निवडणुकाही संपल्या असून स्थिर सरकार सत्तेत आले आहे. त्यामुळे महायुती सरकार लवकरात लवकर या निवडणुका घेईल, अशी अपेक्षा आहे. महायुतीला स्पष्ट बहुमत दिल्यामुळे सध्या चांगले वातावरण आहे.

जिल्हा परिषद

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, धाराशिव, लातूर,

अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा

## जिंतूर येथे भिमा

व मराठा पेशवा संघ च्या मध्ये युद्ध झाले होते त्यामध्ये जास्त सैनिक हे दलीत समाजाचे होते व त्यांनी हे युद्ध जिंकले ह्या युद्धा मध्ये जे - जे विर शहीद झाले त्याना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आजचा दिवस शौर्य दिवस म्हणून साजरा केला जातो त्यामुळे जिंतूर येथे ही शौर्य दिन साजरा करण्यात आला या मध्ये युवराज धनसावध, विकास अण्णा मोरे, सिद्धार्थ घनसावंत, महेन्द्र बनसोडे व समतादलाचे सर्व सैनिक उपस्थित होते

## २ हजार कोटींचा

प्रचलित पद्धतीनुसार विभागनिहाय गाड्या घेण्याची पद्धत बंद करून सर्व विभागांची केवळ तीन समूहांत (क्लस्टर) विभागणी करण्यात आली. प्रत्येक समूहात किमान ४००-४५० याप्रमाणे सात वर्षांसाठी १३१० गाडया भाडेत्त्वावर घेण्याचा निर्णय घेतला गेला. मे. अँथोनी रोड ट्रान्सपोर्ट सोल्युशन प्रा. लि., मे. सिटी लाइफलाइन ट्रॅव्हल्स प्रा.लि. आणि मे. ट्रॅव्हल टाइम प्रा. लि. या तीन कंपन्यांना तीन समूहांत बस पुरवण्याचे इरादापत्र देण्यात आले होते. मात्र यात मोठा घोटाळा झाला असून या निर्णयामुळे सुमारे दोन हजार कोटींचे नुकसान होऊ शकते, अशी माहिती मुख्यमंत्र्यांना देण्यात आल्यानंतर त्यांनी निविदा प्रक्रियेला स्थगित देत चौकशीचे आदेश दिल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी ‘लोकसत्ता’ला दिली.

नवे सरकार अस्तित्वात आल्यानंतर खातेवाटपापूर्वी फडणवीस यांच्याकडेच सर्व विभागांचा कार्यभार होता. त्याच काळात सरकारला अंधारात ठेवून सबंधित कंपन्यांना इरादापत्र देण्यात आल्याचे उघडकीस आले. मुख्यमंत्र्यांनी महामंडळाच्या या कारभाराबाबत नवनियुक्त परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे नाराजी व्यक्त केल्याचेही सूत्रांनी सांगितले. विशेष म्हणजे शेजारच्या गुजरात राज्याने अशीच निविदा प्रक्रिया राबवून प्रति किलोमीटर २२-२४ रुपये दराने वातानुकूलित गाड्या भाडेतत्त्वावर घेतल्याची माहिती समोर आली असून महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी राज्यात एवढ्या वाढीव दराने गाड्या घेण्याचा निर्णय कोणाच्या दबावाखाली घेतला, याची चर्चा आता राजकीय वर्तुळात व महामंडळात रंगली आहे.

नुकसान कसे?

२०२२मध्ये डिझेलसह ४४ रुपये प्रति किलोमीटर या दराने ५०० गाड्या भाडेतत्त्वावर घेण्यात आल्या होत्या.यावेळी कंपन्यांनी दाखल केलेल्या निविदांमध्ये डिझेल खर्च वगळून ३९ ते ४१ रुपये प्रति किलोमीटर दर दाखविला होता.तांत्रिक पात्रता निविदा आचारसंहिता घोषित होण्याच्या काही मिनिटे अगोदर उघडण्यात आल्या. तर वित्तीय निविदा हिवाळी अधिवेशनाच्या काळात उघडण्यात आल्या हेही वाचा : २०२४ आजवरचे सर्वांत उष्ण वर्ष, तापमानात आजपर्यंत सरासरी १.५ अंश सेल्सिअसने वाढ तडजोडीअंती डिझेल खर्च वगळून ३४.३० रुपये आणि ३५.४० रुपये दराने कंपन्यांना इरादापत्र देण्यात आले. डिझेलचा खर्च प्रति किमी सुमारे २० ते २२ रुपये असल्याने हा भार महामंडळावर पडला असता. त्यामुळे मागील निविदेच्या तुलनेत प्रति किलोमीटर सुमारे १२ रुपये अधिक खर्च महामंडळाला होणार होता.ही निविदा सात वर्षांसाठी असल्यामुळे ढोबळमानाने २ हजार कोटींचा भुर्दंड महामंडळाला सहन करावा लागला असता.

## बलभीम महाविद्यालयातील

ऋणानुबंध जपतात, म्हणूनच हा स्नेहमीलन आदर्श आहे. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला मित्रवर्य स्वर्गवासी रवी दोडके, सुनील चोरडिया, सुचिता कागवटे आणि गुरुवर्य राजहंस सर यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सायली भालेराव यांनी करताना प्रत्येक मित्र आणि मैत्रिणींना मनमोकळे प्रश्न विचारून बोलते केले. यामुळे प्रत्येकाने आजपर्यंतचा प्रवास दिलखुलासपणे मांडला. प्रभावी सूत्रसंचलनामुळे प्रत्येक मित्र-मैत्रिणींचा कंठ दाटून आला. आजपर्यंतच्या आयुष्यात आलेले चढ-उतार सर्व वर्ग मित्रांनी व्यक्त केले. वर्गमित्र ॲड. शफिक भाऊ, मुकेश देशमुख, बाळासाहेब शेंडकुडे, राधेश्याम कासट, मंगेश कुलकर्णी, फारुख शेख, मंजुषा देशपांडे, अनिता मोहेकर, सीमा महाजन, सायली भालेराव, मनीषा कपाले आणि अनंत सुतनासे यांनी जुन्या आठवणीना उजाळा दिला. तीस वर्षानंतर केलेला हा गेट-टुगेदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बलभीम ऋणानुबंध या व्हाट्सअप ग्रुपचे डमिन अनंत सुतनासे आणि मनीषा कपाले यांनी विशेष परिश्रम घेतले.

पान १ वरून

## खंडणी प्रकरणाचा

प्रकरणात चौकशी केली जाणार आहे. जे आरोपी फरार आहेत. त्यांचा शोधही सुरू आहे, असेही या अधिकाऱ्याने सांगितले.

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सुदर्शन घुले आणि इतर आरोपी २२ दिवसांपासून मोकाट आहे. सीआयडीने केज न्यायालयात सांगितले होते की, सुदर्शन घुले हा वाल्मीक कराडच्या सांगण्यावरून काम करत होता. त्याला पकडण्यासाठी वाल्मीक कराडची कोठडी महत्त्वाची आहे. बुधवारी (१ जानेवारी) सीआयडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने वाल्मीक कराडची चौकशी केली.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करण्यात आले होते आणि ९ डिसेंबर रोजी अमानुषपणे हत्या करण्यात आली होती. दोन कोटी खंडणी देण्याला विरोध करण्यावरून वाद झाला होता. त्यानंतर संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली.

या हत्या प्रकरणात आतापर्यंत चार जणांना अटक करण्यात आलेली आहे. वाल्मीक कराडचा यात सहभाग असल्याचे आरोप केले जात आहे. पण, त्याला दोन कोटी खंडणी प्रकरणात अटक करण्यात आलेले आहे.

## वाल्मिक कराडचा मोबाईल

खाती गोठवल्याने पैसे काढू शकत नाही. आरोपी संदर्भातील जुने नाते, नवे नाते याचा शोध घेऊन चौकशीसाठी बोलवण्यात येत आहेत. आज २५ जणांचे सीआयडीकडून जवाब नोंदवले आहेत. आत्तापर्यंत दीडशे लोकांची चौकशी सुरू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानंतर आज फरार आरोपींचे बँकेचे खाते गोठवण्यात आले आहे. देशमुख यांच्या अपहरणासाठी वापरलेल्या गाडीवरती आरोपीचे ठसे जुळल्याची झाल्याची माहिती आहे. गाडीत फरार आरोपींचे मोबाईल देखील सापडले असून त्याचा तपास करण्यासाठी पथकाने संबंधित मोबाईल फॉरेन्सिक तपासासाठी पाठवले आहेत. फरार आरोपींच्या मालमत्ता जप्तीसाठी न्यायालयाकडे अर्ज देखील सीआयडी कडून दाखल करण्यात आली आहे.

अटकपूर्व जमिनीसाठी अर्ज नाही

या प्रकरणातील फरार आरोपींपैकी अद्याप कोणीही अटकपूर्व जमिनीसाठी अर्ज केलेला नाही . आरोपींपैकी फक्त एका आरोपीकडे पासपोर्ट तोही आरोपी अटकेत असल्याने इतर आरोपी परदेशी जाण्याचा अधिकृत मार्ग बंद करण्यात आला आहे. या प्रकरणातील सर्वात चर्चेत असलेले आरोपी वाल्मीक कराड यांच्यावर दाखल असलेल्या गुन्ह्यांमुळे त्यांना पासपोर्टच नसल्याची देखील माहिती आहे.

## ’फरार आरोपींना अटक न

अटक करण्याची मागणी केली, अन्यथा रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा दिला.

मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी आज माध्यमांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्य सरकारला इशारा दिला. जरांगे पाटील म्हणाले, सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील अजूनही मुख्य आरोपी फरार आहेत. सर्व आरोपींना अटक होऊन न्याय मिळावा अशी आमची इच्छा आहे. वाल्मीक कराड याला अटक झाली आहे. आता मोठे मासे सापडती, आरोपींना अटक नाही झाल्यास आम्ही रस्त्यावर उतरणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

या प्रकरणात पोलिस कुणालाही सोडणार नाहीत. यावेळी धनंजय मुंडे यांच्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला, यावर बोलताना जरांगे म्हणाले, चौकशी सुरु आहे. संबंध आहे की नाही हे सिद्ध होईलच. यामध्ये जे जे येतील त्यांना सुट्टी दिली तर महाराष्ट्र बंद पाडणार, असंही जरांगे पाटील म्हणाले.

## हत्या प्रकरणाच्या तपासासाठी

एसआयटीमध्ये कोण कोण? वाचा संपूर्ण यादी

१) अनिल गुजर, पोलीस उप अधीक्षक २) विजयसिंग शिवलाल जोनवाल, स. पो. निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बीड ३) महेश विघ्ने, पो. उ. निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बीड ४) आनंद शंकर शिंदे, पो. उ. निरीक्षक, केज ५) तुळशीराम जगताप, सहा. पो. उ.निरीक्षक ६) मनोज राजेंद्र वाघ, पोलीस हवालदार ७) चंद्रकांत एस. काळकुटे, पोलीस नाईक ८) बाळासाहेब देविदास अहंकारे, पोलीस नाईक ९) संतोष भगवानराव गित्ते, पोलीस शिपाई

तपासाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या घडामोडी

संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास आता आणखी वेगाने होतोय. राज्य सरकारने आरोपी वाल्मिक कराड याला पकडण्यासाठी त्याचे आर्थिकदृष्ट्या नाक आणि तोंड दाबण्याचा प्रयत्न केला. राज्य सरकारने त्याची संपत्ती जप्त केली. तसेच बँक खाते देखील गोठवले. यानंतर वाल्मिक कराड हा सीआयडीला शरण आला. विशेष म्हणजे गेल्या २२ दिवसांत वाल्मिक कराड हा मध्य प्रदेश, गोवा आणि कर्नाटक या राज्यांमध्ये फिरला. यानंतर तो महाराष्ट्रात पुण्यात आला. तो त्याच्या समर्थकांसह पुण्यात सीआयडी कार्यालयात सरेंडर होण्यासाठी काल दाखल झाला. त्याच्या समर्थकांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या. अखेर सीआयडी तपासातून कराड हा तीन राज्ये फिरल्याची माहिती समोर आली.

वाल्मिक कराड याला केज कोर्टाने १४ दिवसांची कोठडी सुनावली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी सुदर्शन घुले हा फरार आहे. त्याचा शोध पोलीस आणि सीआयडीचे पथक घेत आहेत. वाल्मिक कराड याच्या अटकेनंतर आता तो लवकर सापडेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. सीआयडीचे पथक सर्व कॉल रेकॉर्ड, सीडीआर युद्ध पातळीवर तपासत आहेत. आरोपींच्या लवकरात लवकर मुसक्या आवळण्याचा प्रयत्न सुरु आहे.

त्यासाठी सीआयडीच्या पथकाने जंग जंग पछाडलं आहे. १०० पेक्षा जास्त जणांचा जबाब नोंदवण्यात आला आहे.

## मस्साजोग ग्रामस्थांचे

सहभागी झाले होते. या आंदोलनात संतोष देशमुख यांचे फोटो हातात घेऊन महिला देखील पाण्यात उतरल्या. या आंदोलनावेळी काही महिला आंदोलकांची प्रकृती बिघडली. त्यांना तलावातून बाहेर काढण्यात आले.

आंदोलनस्थळी बीडचे पोलिस अधीक्षक नवीन कॉवत हे दाखल झाले. पोलिसांनी आंदोलकांची समजूत काढत असताना ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला. यावेळी ग्रामस्थांनी पोलिसांकडे आरोपींना अटक करण्याची मागणी केली. सामान्य लोकांना ज्या गोष्टी माहीत आहेत, त्या पोलिसांना का माहीत नाहीत? असा सवाल ग्रामस्थांनी केला. आरोपींना कधी अटक करणार, ती तारीख सांगा. तोपर्यंत आम्ही तुम्हाला काही बोलणार नाही. त्यानंतर आम्हा सर्व गावकऱ्यांना गोळ्या घाला, असे म्हणत गावकऱ्यांनी रोष व्यक्त केला.

...तर आरोपी फरार झालेच नसते - ग्रामस्थ

संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर सुरुवातीचे ३ दिवस पोलिसांनी नाकाबंदी केली असती, तर आरोपी फरार झालेच नसते. पण पोलिस प्रशासन त्यावेळी सुस्त का राहिले? तसेच पोलिसांवर कुणाचा दबाव आहे, असा सवालही गावकऱ्यांनी पोलिस अधीक्षकांना केला. वाल्मिक कराड हा स्वतःहून पोलिसांसमोर आला आहे, मग पोलीस काय करत आहेत? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी केला आहे. पोलिस निरीक्षक महाजन यांच्यावरही कारवाई करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

बीड पोलिसांकडून पूर्ण ताकदीने तपास सुरू असून फरार आरोपींना लवकरात लवकर अटक होईल, असे पोलिस अधीक्षक नवीन कॉवत म्हणाले. १० दिवसांच्या आत आरोपींना अटक करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे पोलिस अधीक्षक कॉवत यांनी सांगितले. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना पोलिस संरक्षण दिलेले आहे. एसआयटीसाठी शासनाने जीआर काढलेला आहे. आयपीएस अधिकारी बसवराज तेली यांना त्या एसआयटीचे प्रमुख केले आहे, अशी माहिती पोलिस अधीक्षकांनी दिली.

गेले २२ दिवस फरार असलेला वाल्मीक कराड मंगळवारी सीआयडीसमोर शरण आला. त्याला केज न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला १४ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावली आहे. त्याच्यावर केजमधील पवनचक्की कंपनीकडे खंडणी मागीतल्याचा त्याच्यावर आरोप आहे. याच प्रकरणात त्याच्यावर गुन्हा दाखल आहे. वाल्मिक कराड शरण आला असला, तरी आणखी मुख्य आरोपीसह त्याचे दोन साथीदार अजूनही मोकाट आहेत.

## पांगरी शिवारात रब्बी पिकांची

करत पिकांना पाणी देऊन रब्बी हंगामातील पिके शेतकरी जोपासत आहेत.याच पद्धतीने पांगरी शिवारातील साहेबराव थोरात आणि कुटुंबीयांनी त्यांच्या गट नंबर ७७ या जमिनीत हरभरा पिकाची पेरणी केली होती.पैकी तब्बल पाच ते सहा एक्कर क्षेत्रावरील हरभरा रानडुकरांनी फस्त करत लाखो रुपयांचं नुकसान केल्याचं निदर्शनास येत आहे.रानडुकरांसह हरिण या दोन्ही जंगली प्राण्यांकडून टोळक्याने येऊन रात्री हरभरा पिकाचे प्रचंड नुकसान सुरू आहे.सदरील शेतकऱ्याकडून जंगली प्राण्यांचा बंदोबस्त करण्यासह झालेल्या पिकाच्या नुकसानीची भरपाई करून देण्याची मागणी केली जात आहे.हीच परिस्थिती गावातील अन्य शेतकऱ्यांची सुद्धा असून गावात हरीण आणि रानडुक्कर या प्राण्यामुळे शेतकऱ्यांचा रब्बी पिकाचे मोठ नुकसान होत असून या जंगली प्राण्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी गावकऱ्यांकडून केली जात आहे.

गावातील गट नंबर ७७ येथे माझ्यासह कुटुंबीयांच्या नावे असलेल्या जमिनीमध्ये आम्ही यंदा रब्बी हंगामात हरभरा पिकाची पेरणी केली होती. मागील आठ दिवसापासून रात्री रानडुकरांकडून हरभरा पिकाचे प्रचंड मोठ्या प्रमाणावर नुकसान सुरू आहे. हरभरा काढणी अजून पंधरा दिवसाच्या पुढे आहे सध्या शेतात रानडुकरांच्या नुकसानीतून उर्वरित राहिलेल्या हरभरा पिकाची राखण जीव धोक्यात घालून करावी लागत आहे.या हरीण आणि रानडुकरांचा बंदोबस्त शासनाने करावा तसेच झालेल्या नुकसानीच्या भरपाईची मागणी शासनाकडे करत आहोत.

## तालुक्यातील आणखी

५१ हजार असे साधारण अडीच लाख रुपये काढून घेत एका खोलीत हात आणि पाय बांधून डांबून ठेवले. कशीतरी सुटका करून इंगळे त्या ठिकाणहुन पळून आले असे त्यांचे म्हणणे आहे.

या संदर्भात इंगळे यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात तक्रार दिली असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. विशेष म्हणजे या माजी सरपंचाच्या पायात कुलूप लावलेले दिसत आहे. तर हाताला बांधलेले वण दिसत आहेत. यामुळे खळबळ उडाली असून याचा पोलीस तपास घेत आहेत.

## धान-भरडधान्य खरेदीसाठी

ॲड. आशिष जयस्वाल, माजी मंत्री व ज्येष्ठ सदस्य सुधीरभाऊ मुनगंटीवार, आ. राजू कारेमोरे यांच्यासह विविध लोकप्रतिनिधींनी केली होती. या मागणीस अनुसरून शेतकरी नोंदणीची मुदत १५ जानेवारी २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. याबाबत अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या उपसचिव राजश्री सारंग यांनी महाराष्ट्र राज्य कोऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन आणि महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळासह संबंधित एजन्सी यांना याबाबत कळवले आहे.

ही मुदतवाढ अंतिम असून विहित मुदतीत शेतकऱ्यांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.

## तीन दिवस चालणार सुनावणी, १२६० शस्त्र परवाने, २४५ जणांविरूध्द गुन्हे दाखल

# शस्त्र परवानाधारकांचा आढावा सुरु, १०० जणांची घेतली सुनावणी...!

**बीड, (दिव्य न्युज):– जिल्ह्यातील जवळपास १२६० पेक्षा अधिक जणांकडे शस्त्र परवाने असून, त्यापैकी २४५ जणांविरुद्ध गुन्हे दाखल आहेत. गुन्हे दाखल असलेल्या परवानाधारकांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत. शस्त्र परवानाधारकांचा आढावा घेतला जात आहे. मंगळवारी १०० परवानाधारकांची सुनावणी घेण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे.**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न समोर आला होता. तसेच आ. सुरेश धस यांनी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात टिकल्या बंदुका वाटल्याप्रमाणे शस्त्र परवाने दिले असल्याचा दावा केला होता. त्यानंतर खुद्द मुख्यमंत्र्यांनी बीड जिल्ह्यात अराजकता असल्याचे सांगितले होते. त्यानंतर जिल्हा प्रशासन यंत्रणा खडबडून जागी झाली. त्यानंतर २७ डिसेंबरपासून गुन्हे दाखल असलेल्या परवानाधारकांना नोटिसा पाठवून आपला परवाना का रद्द करू नये? अशी विचारणा केली आहे. मंगळवार, बुधवार व गुरुवार हे तीन दिवस शस्त्र परवानाधारकांचा आढावा घेऊन सुनावणी घेतली जाणार आहे.जिल्ह्यातील वातावरण तणावपूर्ण आहे. गुन्ह्यांची संख्या वाढली असून, अनेकांच्या हातात कट्टे देखीलपाहावयास मिळत आहे. कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी गुन्हे दाखल असलेल्या परवानाधारकांचे परवाने रद्द होणे आवश्यक आहे.



### ४ गुन्हे असलेले १७ जण

जिल्ह्यात आतापर्यंत जवळपास १२६० पेक्षा अधिक जणांकडे शस्त्र परवाने असून, त्यापैकी २४५ जणांविरुद्ध गुन्हे दाखल आहेत. त्यामध्ये १६ गुन्हे असलेला १, ४ गुन्हे असलेला १ जण, ४ गुन्हे असलेले १७ जण, १२ गुन्हे असलेला १ जण, यांसह इतर परवानाधारकांचा समावेश आहे. सावकार, खंडणीखोर गुन्हेगार, राजकीय नेत्यांकडे बंदूक परवाने आहेत. त्यावर तातडीने निर्णय घेऊन शस्त्र परवाने रद्द करावेत, अशी मागणी आता होऊ लागली आहे. विशेष म्हणजे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घातले असल्यामुळे गुन्हे दाखल असलेल्यांचे परवाने रद्द होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### पोलिसांकडून आली नाही माहिती

गुन्हे दाखल असलेल्या परवानाधारकांच्या गुन्ह्यांची सद्यःस्थिती काय आहे, याची विचारणा जिल्हा प्रशासनाने पोलिसांकडे केली होती. मात्र, सोमवार– पर्यंत तरी याबाबतची माहिती देण्यात आली नव्हती.

तसेच परवाने नूतनीकरण करताना गुन्हे दाखल असलेल्या व्यक्तींना पोलिसांनी एनओसी कशी दिली, हा प्रश्नदेखील यानिमित्ताने निर्माण झाला आहे.

### ५ ते १० लाख रुपयांत शस्त्र परवाना

बीडमध्ये २०२१ मध्ये बीड जिल्ह्यात १०९८ परवानाधारक होते. २०२४ पर्यंत ही संख्या १२६० पर्यंत जाऊन पोहोचली. म्हणजे या ४ वर्षाच्या कालावधीत १८३ परवाने वाटप केले गेले. पोलिस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परवाना मिळवून देण्यात बीड जिल्ह्यातील मोठ्या अधिकाऱ्यांची लॉबी सक्रिय आहे. आमदार आणि खासदारांनी केलेल्या शिफारशीनंतर ५ ते १० लाख रुपयांत शस्त्र परवाना मिळविल्याची चर्चा आहे.

## शेख अशफाक यांना द स्कूल एक्सप्रेसचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर



बीड (दिव्य न्युज ):- तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री. नारायणा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक शेख अशफाक अहेमद कय्युम यांना साप्ताहिक द स्कूल एक्सप्रेस चा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे असलेल्या श्री. नारायणा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक शेख अशफाक अहेमद कय्युम हे सन २००५ पासून सहशिक्षिक पदावर कार्यरत आहेत. गेल्या एकोणीस वर्षांच्या काळात त्यांनी आपल्या अध्यापनाने ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालकांच्या मनात आपल्या उत्कृष्ट कार्याने आदर निर्माण केला आहे. विद्यार्थी आणि शिक्षणासाठी ते आपल्याकडून सर्वतोपरी सहकार्य करतात. शिकविण्याच्या लाघवी पद्धतीमुळे ते एक विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून लोकप्रिय आहेत. शिवाय विद्यार्थ्यांना शिक्षणासह इतर उपक्रमात सहभाग घेण्याकरिताही ते नेहमी प्रोत्साहन देतात. त्यांच्या रूपात ग्रामीण भागातील शाळेला सुद्धा एक उत्कृष्ट शिक्षक मिळाल्याने ग्रामीण भागातून शहरी भागात येणाऱ्या विद्यार्थ्यांचा लोंढा थांबविण्यात त्यांना यश मिळाले आहे. त्यांच्या अशाच उत्कृष्ट कार्याची नोंद घेत शिक्षण क्षेत्रात गेल्या पंधरा वर्षांपासून मराठवाडा विभागात शिक्षणाला वाहिलेले एकमेव वृत्तपत्र म्हणून सर्व परिचित असलेल्या साप्ताहिक द स्कूल एक्सप्रेस ने त्यांची यावेळी देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड केली आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा येत्या दिनांक ०५ जानेवारी २०२५ रविवार रोजी अहेमदनगर रोडवरील शासकीय विश्रामगृह समोर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक भवन, बीड येथे सकाळी ११:०० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. मानाच्या या पुरस्कारासाठी सहशिक्षक शेख अशफाक अहेमद कय्युम यांची निवड झाल्याने त्यांच्यावर समाजाच्या सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून पुढील कार्यासाठी सदिच्छा व्यक्त करत शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## अंबाजोगाई इज्तेमासाठी जादा बसेस सोडा : नुमान चाऊस



बीड (दिव्य न्युज ):- इस्लाम व मानवतेची शिकवणूक देण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या इज्तेमाचा यावर्षीचा कार्यक्रम आंबेजोगाई येथील चांदमारी ग्राउंड सदर बाजार येथे दोन व तीन जानेवारी २०२५ ला होत आहे. मानवतेच्या कल्याणासाठी लोकांनी स्वत:ची वागणूक चांगली करावी तसेच अन्य समाज प्रबोधनाचे व्याख्यान तिथे होणार आहे. या अनुषंगाने त्यास उपस्थिती लावण्यासाठी मुस्लिम बांधव हजारोचे संख्येने प्रत्येक तालुका व गावातून येतील. लोकांचा प्रवास हा सुखरूप असावा व इतर प्रवाशांना गर्दीचा सामना करावा लागू नये तसेच एस टी महामंडळाला जास्त प्रवासी मिळवून फायदा व्हावा यासाठी इज्तेमा काळात माजलगाव आगारातून आंबेजोगाईला जादा बसेस सोडण्यात यावे अशी मागणी मौलाना आझाद युवा मंचचे बीड जिल्हा अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी निवेदनाद्वारे माजलगाव एसटी आगर प्रमुख यांना केली आहे.



सिल्लोड : शहरातील एस. आर. लॉन्स मध्ये शेख इर्शाद शेख जफर यांचा बुधवारी लग्न सोहळा पार पडला त्या निमित्ताने शेख इर्शादचा सत्कार करताना हाजी शेख नईम ,शेख जफर, शेख सुब्हान ,शेख मज़हर, अब्दुल हमीद , शेख सलीम , शेख इब्राहिम , शेख हकीम सर शेख समीर दिस्त आहे.(छायाचित्र :शेख अफसर सिल्लोड)


## वडवणी पोलीसांची दोन हातभट्टी तर एक जुगार अड्ड्यावर धाड

वडवणी (दिव्य न्युज ):- ३१ डिसेंबरला अनेक ठिकाणी अवैधरित्या दारूची जोरदार विक्री दरवर्षीच होत असते तसेच रात्रभर दारू पार्ट्या केल्या जातात त्यामुळे अनेक दारू विक्रेत्यांनी ३१ डिसेंबरला दारू विक्री साठीचे नियोजन करून दारू साठे केलेले आहेत. याची माहिती वडवणी पोलिसांना मिळताच वडवणी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी पोलिसांनी ३० डिसेंबर रोजी संध्याकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान वडवणी तालुक्यातील चिंचाळा आणि साळींबा या ठिकाणी धाडी टाकून गावठी दारू हातभट्टी विक्रेत्यावर कारवाई केली असून यामध्ये ७७०० रुपये किमतीची ७७ लिटर हातभट्टी चा साठा पोलिसांनी पकडला आहे चिंचाळा येथे ३७ लिटर हातभट्टी याची किंमत ३७०० रुपये आहे तर साळींबा येथे ४० लिटर हातभट्टी याची किंमत चार हजार रुपये आहे.चिंचाळा आणि साळिंबा येथील दोन दारु विक्रेत्यावर दारूबंदी कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. तसेच वडवणी शहरांमध्येही एका जुगार अड्ड्यावर धाड टाकण्यात आली असून कल्यान नावाचा मटका चालकावर कारवाई करण्यात आली असून या ठिकाणी २२०० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे या कारवाई मध्ये पो. ना. खरात, कप्पे, लटपटे, राऊत, केदार, नाईकवाडे, गवळी, इरमले आणि कवचट यांनी यांनी वरील कारवाई केल्या आहेत पुढील तपास हे वडवणी पोलीस हे करत आहेत.

### नेकनुर ग्राम पंचायतीचा धक्कादायक प्रकार उघडकीस

# १५ वा वित्त आयोगाचा निधी किती आला व कुठे खर्च झाला माहीत नाही

## ग्रामपंचायत अधिकारी शंकर वाघमारे यांच्या कडून लिखित स्वरूपात माहिती



शंकर बी.वाघमारे
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय,नेकनूर,
ता.जि.बीड

**नेकनुर,(दिव्य न्युज):– नेकनुर ग्राम पंचायतला १ डिसेंबर २०२३ ते २० सप्टेंबर २०२४ पर्यंत १५ व्या वित्त आयोगाचा निधी किती आला व कुठे खर्च करण्यात आला याचे निधी मंजुरी पत्र ,बँक स्टेटमेंट,कामाचे अंदाजपत्रक, मोजमाप नोंदवही निधी वितरण कागदपत्रे ,व जनरल बजेट किती आला व कुठे खर्च झाला याची माहिती अधिकार कायदा अंतर्गत माहिती मागितली असता ग्रामपंचायत अधिकारी शंकर वाघमारे यांनी लेखी स्वरूपात माहिती दिली की १५ वा वित्त आयोगाचा निधी किती आला व कुठे खर्च झाला याचे कोणतेही कागदपत्र पदभार मध्ये मिळाली नाही म्हणून त्याविषयी अशी माहिती दिली आहे.**




केंद्र सरकार कडून १५ वा वित्त आयोगाचा ८० टक्के निधी डायरेक्ट ग्राम पंचायत मिळत असुन निधी ग्राम पंचायतीच्या खात्यावर जमा होतो तो निधी केंद्र सरकारच्या निकषानुसार खर्च करावा लागतो या मध्ये शिक्षण आरोग्य, महिला बालकल्याण,अनुसुचीत जाती जमाती कल्याण, पाणी पुरवठा, रस्ते नाली बांधकाम व दुरुस्ती अशा प्रकारे निधी खर्च करावा लागतो ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन असताना ग्रामपंचायत अधिकारी माहिती देतात जवळपास १ कोटी ६ लाखांचा आलेला निधी ही त्यांना माहित नाही कुठे खर्च झाला हे ही माहित नाही ते ही त्यांनी लेखी स्वरूपात माहिती दिली आहे जिल्ह्यातील सर्वात मोठी असलेल्या नेकनुर ग्राम पंचायतचा कार्यभार कसा चालतो माहिती अधिकारात धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.१५ वा वित्त आयोगाच्या कामात मोठा भ्रष्टाचार झाला असावा हा सर्व प्रकार उघडकीस येऊ नये म्हणून अशा प्रकारे माहिती देण्यात आली आहे. म्हणून ग्रामपंचायत अधिकारी शंकर वाघमारे यांनी दिलेल्या लेखी माहिती विषयी तक्रार जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.बीड , गटविकास अधिकारी पं.स.बीड यांच्या कडे करण्यात येणार आहे .

विशेष म्हणजे नेकनूर, सावंतवाडी, वैतागवाडी ग्रुप ग्रामपंचायत मध्ये गावाच्या विकासासाठी शासनाने एक कोटी सहा लाख रुपयेचा निधी दिला होता . तात्कालीन ग्रामपंचायत अधिकारी दत्ता नागरे यांनी काही ना जवळ घेऊन काम झाले म्हणून दुकानावर जाऊन बोगस बिले आणुन काम झाले म्हणून असे दाखुन लाखो रुपये उचलले जेव्हा दत्ता नागरे यांची शासनाने बदली केली त्यावेळी त्यांच्या जागेवर आलेले नवीन ग्रामपंचायत अधिकारी शंकर वाघमारे यांना पदभार देताना एक सुद्धा कागद या पदभार मध्ये दिला नाही मग ही कागद पत्रे गेली कुठे असा प्रश्न उपस्थित होत आहे

जेव्हा नेकनूर ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत अधिकारी वाघमारे यांना विचारपूस केली असतांना ते म्हणाले १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत आलेल्या निधीचा एक सुद्धा कागद ग्रामपंचायत मध्ये नाही मी कुठून देऊ अशी धक्कादायक माहिती ग्रामपंचायत अधिकारी यांनी दिली आहे.




बीड : कडू आणि गोड आठवणींचा ठेवा ठेवून २०२४ या वर्षाने निरोप घेतला. लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूका पाहणारे हे वर्षे जिल्ह्यात सुखद आणि विदारक घटनांचा अनुभव देत सरले. नव्या वर्षात नवे संकल्प करीत मावळत्या वर्षाला निरोप आणि नव्या वर्षाचे स्वागत करण्यात आले. ३१ डिसेंबर रोजी मावळत्या सुर्याचे टिपलेले हे सुंदर छायाचित्र.

# चार वर्षापासून 'तारीख पे तारीख' चा खेळ सुरुच

## यंदा तरी मरणासन्न झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीला मुहूर्त लागणार?

मुंबई, (दिव्य न्युज):- महाराष्ट्राच्या राजकीय साठमारीत गेल्या चार तारीख पे तारीख झाल्याने जिल्हा परिषदा आणि मनपांच्या निवडणुका रखडल्या आहेत. गेल्या चार वर्षांपासून फक्त तारीख पे तारीख झाल्याने सुप्रीम कोर्टात अजूनही तोडगा निघालेला नाही. अशा स्थितीत आता पुढील सुनावणीची तारीख सर्वोच्च न्यायालयात २२ जानेवारीला असून निवडणुकीबाबत सुनावणी होणार आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर निवडणुकांचे भविष्य असणार आहे. यावर्षी निकाल लागण्यासाठी सरकार शर्थीचे प्रयत्न करणार आहे. राज्यातील २९ महागनरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषद आणि २८९ पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचे लक्ष आहे.

▶▶ पान २ वर

# जिंतूर येथे भिमा कोरेगाव शौर्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला

जिंतूर(दिव्य न्युज ):-आज दिनांक १ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता जिंतूर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर आंबेडकर अनुयायी च्या वतीने २०७ व्या शौर्य दिनानिमित्ताने मानवंदना व अभिवादन करण्यात आले सन १ जानेवारी १८१८ मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कपंनी ▶▶ पान २ वर



# २ हजार कोटींचा एसटी घोटाळा

## परिवहन महामंडळाने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर १३१० गाड्या भाडेतत्त्वावर घेण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविली होती

मुंबई, (दिव्य न्युज):- राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) १३१० बस गाड्या भाडेतत्त्वावर घेण्याचा निर्णय सरकारला अंधारात ठेवून घेतल्याचे समोर आले असून हा निर्णय वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. या व्यवहारात महामंडळाने ठेकेदारावर खास मेहरबानी दाखविल्याचे बोलले जात असून त्यामुळे महामंडळाला सुमारे दोन हजार कोटींचा आर्थिक फटका बसला असण्याची शक्यता आहे. त्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्णयाला स्थगिती दिली असून परिवहन विभागाच्या अप्पर सचिवांमार्फत चौकशीचे आदेश दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

परिवहन महामंडळाने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर १३१० गाड्या भाडेतत्त्वावर घेण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविली होती.

▶▶ पान २ वर




# बलभीम महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी तीस वर्षानंतर साजरा केला गेट-टु-गेदर सोहळा

बीड(दिव्य न्युज ):- शहरातील नामांकित बलभीम महाविद्यालयात सन १९९०-९५ पर्यंत शिक्षण घेतलेले वाणिज्य शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनींनी तीस वर्षानंतर औरंगाबाद येथे एकत्रित येऊन स्नेह मिलन (गेट-टुगेदर) कार्यक्रम देवगिरी हुरडा पार्टी येथे साजरा केला.

शालेय मित्र-मैत्रिणींचा स्नेह मिलन कार्यक्रम आपण नेहमी पहातो किंवा वाचत असतो परंतु महाविद्यालयीन मित्र आणि मैत्रिणींचे गेट-टुगेदर फार कमी होतात. महाविद्यालयीन विद्यार्थी अवघे दोन-पाच वर्ष जरी सोबत राहत असले तरी मैत्रीची नाळ कायम जपणारे मित्र आणि मैत्रिणी आयुष्यभरासाठी मैत्रीचे

▶▶ पान २ वर









# जिंतूरात मराठी पत्रकार संघाच्या वतीने गौरी सांवत यांचे व्याख्यान

## राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचा होणार सन्मान

जिंतूर(दिव्य न्युज ):- तालुका मराठी पत्रकार संघातर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दर्पण दिनाचे औचित्य साधत दि.०७ जानेवारी रोजी संध्याकाळी सहा वाजता शहरातील भाजी मंडई परिसरातील कन्या प्रशाला मैदानात आंतरराष्ट्रीय व्याख्यात्या श्रीगौरी सावंत यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.दर्पण दिना निमित्त दि. सहा जानेवारी रोजी पत्रकार भावनांमध्ये ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान, पत्रकारांना विम्याचे, भेटवस्तूचे वाटप तर दि.०७/०१/२०२५ जानेवारी रोजी श्रीगौरी सावंत यांच्या जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यमंत्री ना. मेघना बोर्डीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय पोलिस अधिकारी जीवन बेनिवाल, श्री तुळजाभवानी साखर कारखान्याच्या चेअरमन भावना बोर्डीकर, सुंदरलाल सावजी अर्बन बँकेचे चेअरमन मुकुंद सावजी कळमकर, ज्येष्ठ विधीज्ञ अशोक सोनी, ब्रिजगोपाल तोष्णीवाल, एड. मनोज सारडा,माजी नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत या कार्यक्रमांमध्ये पत्रकारितेला ज्यांनी संपूर्ण आयुष्य वाहिले आहे असे पत्रकार एम ए माजिद, निहाल अहेमद यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात येणार आहे या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान संघाचे अध्यक्ष, पदाधिकारी व सदस्यांच्या वतीने करण्यात आले आहे.





## ना मेघना बोर्डीकर यांचा सन्मान

या कार्यक्रमात आ मेघना बोर्डीकर यांच्या रूपाने तालुक्याला तब्बल ४० वर्षानंतर मंत्रिपद मिळाले असून त्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.







हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०